मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# गणेशोत्सव शांततापूर्ण पार पाडण्यासाठी मंडळांचे सहकार्य महत्वाचे : विनयकुमार चौबे

## ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, आकुर्डी येथे गणेशोत्सव 2024 नियोजन बैठक : "श्री.मोरया पुरस्कार 2023" वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

यंदाचा गणेशोत्सव शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील गणेश मंडळांचे सहकार्य महत्वाचे असल्याचे मत पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी व्यक्त केले आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या वतीने ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, आकुर्डी येथे गणेशोत्सव २०२४ नियोजन बैठक व "श्री.मोरया पुरस्कार २०२३" वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.



या कार्यक्रमास पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त विशाल गायकवाड, पोलीस उप आयुक्त बापू बांगर, पोलीस उप आयुक्त डॉ. शिवाजी पवार, महापालिकेचे मुख्य महिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उप आयुक्त अण्णा बोदडे तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार आणि शहरातील विविध गणेश मंडळांचे तसेच सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे म्हणाले की, गणेशोत्सवाच्या माध्यमातून सर्व समाजाला एकत्र आणण्याची संकल्पना लोकमान्य टिळकांनी आणलेली आहे. यंदाचा गणेशोत्सव शांततापुर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस आयुक्तालय कटिबद्ध असून यामध्ये गणेश मंडळांचे सहकार्यही तितकेच महत्वाचे आहे. तसेच पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित प्रोत्साहनपर गणेशोत्सव स्पर्धेत पुढील वर्षी छोट्या गणेश मंडळांनाही सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न केले जातील आणि सुरूवातीपासूनच गणेश मंडळांनी केलेल्या विविध उपक्रमांचे परिक्षण करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल जेणेकरून कोणतेच मंडळ स्पर्धेपासून वंचित राहणार नाही. पारंपारिक पद्धतीने पर्यावरण पूरक गणपती उत्सव साजरा करावा. गणेशोत्सव दरम्यान स्वयंसेवक म्हणून काम करण्यास इच्छुक असतील तर त्यांना ट्रेनिंग द्यावे. गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केलेल्या परिसरात आग प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच मंडपाजवळ काही अनोळखी, संशयीत, बेवारस वस्तु उदा. सुटकेस, रेडिओ, मोठे घड्याळ, जेवणाचे डबे, सायकली वगैरे आढळून आल्यास अगर संशयीत व्यक्ती, इसम जवळपास फिरताना रेंगाळताना दिसल्यास ताबडतोब पोलिसांना कळवावे. गणेश मूर्तीच्या अंगावर मौल्यवान दागिने असणाऱ्या गणेश मंडळांनी संरक्षणाची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. श्रीं च्या मुर्तीच्या संरक्षणाकरीता मंडळाचे कार्यकर्ते अथवा खाजगी सुरक्षा रक्षक २४ तास हजर राहतील याची दक्षता घ्यावी जेणेकरून चोरीच्या घटना टाळण्यास मदत होईल. लेझरच्या वापरामुळे लोकांना डोळ्याचा त्रास होतो डोळे निकामी होतात लेझरचा वापर टाळावा कारण लहान मुले व वयस्कर व्यक्ती यांना सुद्धा इजा पोहोचू शकते. माझे निवेदन आहे की लोकांनी लेझरचा वापर टाळावा तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे येणारे गणेश उत्सव सर्वांनी जोमाने साजरा करावेत. तसेच यंदाचा गणेशोत्सव शांततापुर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी गणेश मंडळांनी सहकार्य करावे; पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी आवाहन केले. (उर्वरित पान २ वर)

# 'सिंथेटिक ट्रॅक' च्या निकृष्ट कामाची चौकशी करा : अजित गव्हाणे

## नव्या सिंथेटिक 'ट्रॅक'ची वर्षभरापासून दुर्दशा; प्रशिक्षक, खेळाडूंचा संताप; आंदोलनाचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघातील भ्रष्टाचारी कारभाराची अनेक उत्तम उदाहरणे समोर येत आहेत. छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याच्या उभारणीपूर्वीच मूर्तीच्या 'मोजडी'ला तडे गेल्याचे नुकतेच महाविकास आघाडीने उघडकीस आणल्यानंतर, आता इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलातील वर्षभरापूर्वी बसविलेला 'सिंथेटिक ट्रॅक' (इपीडीएम पियूस्प्रे ट्रॅक) उखडून त्याची पूर्णतः दुर्दशा झाली असल्याचे समोर आले आहे. या नवीन ट्रॅकसाठी वर्षभरापूर्वी चार कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. मात्र हा संपूर्ण खर्च पाण्यात गेले असल्याचे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी म्हटले आहे. (उर्वरित पान 3 वर)



> "शहरातील अॅथलेटिक खेळाडूंना पूर्वी सरावासाठी बालेवाडी येथे जावे लागत होते. त्यामुळे आम्ही पाठपुरावा करून इंद्रायणीनगर संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलात सिंथेटिक ट्रॅक करून घेतला. ट्रॅकच्या कॉलिटीकडे अत्यंत गंभीर दुर्लक्ष झालेले आहेत. खेळाडूंच्या गरजा काय आहेत हे लक्षात न घेता येथे काम करण्यात आलेले आहे. येथे येणाऱ्या खेळाडूंना क्रीडा साहित्य देखील वेळेवर मिळत नसल्याची इथली परिस्थिती आहे. आम्ही जे प्रकल्प उभारले त्या प्रकल्पांची योग्य काळजी देखील भाजप पदाधिकाऱ्यांना घेता आलेली नाही. खेळाडूंना दुखापत होण्याची शक्यता असल्यामुळे या ट्रॅकवरील सराव तात्काळ थांबविण्याची गरज आहे. प्रशासनाने तातडीने ट्रॅकची दुरुस्ती करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.
>
> - संजय वाबळे, माजी नगरसेवक, इंद्रायणी नगर.

# पिंपरी-चिंचवडला जलस्वयंपूर्ण बनवण्याची संकल्पपूर्ती!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांनी साधला नागरिकांशी संवाद, आंद्रा भामा आसखेडचा दुसरा टप्पा जून-2025 पर्यंत पूर्ण होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

भविष्यातील २०४१ मधील संभाव्य लोकसंख्या गृहित धरुन शहराला पाणी पुरवठ्याचे स्त्रोत निर्माण करण्याच्या दृष्टीने आम्ही काम करीत आहोत. आंद्रा भामा आसखेड प्रकल्पातील पहिल्या टप्प्यात १०० एमएलडी पाणी शहरात दाखल झाले. आता दुसऱ्या टप्प्याचे काम जून- २०२५ पर्यंत पूर्ण होईल. त्याद्वारे १६८ एमएलडी पाणी मिळणार आहे. पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील 'जैसे थे' आदेश रद्द केला आहे. निगडी जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता वाढवली आहे. समाविष्ट गावांतील विविध ठिकाणी जलकुंभ आणि नवीन जलवाहिनीचे काम सातत्याने सुरू आहे. विशेष म्हणजे, आगामी काळात मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी आरक्षीत करावे. या करिता राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली. (उर्वरित पान 3 वर)



### पिंपरी-चिंचवडकरांची साथ मिळाली...

» शहराच्या स्थापनेपासून पवना धरण हा एकमेव जलस्त्रोत होता. वाढती लोकसंख्या आणि नागरीकरण यामुळे नवीन जलस्त्रोतांची निर्मिती करणे काळाची गरज होती. अन्यथा शहरात पाणी संकट उभा राहिले असते. किंबहुना आजही समाविष्ट गावांतील अनेक सोसायट्यांमध्ये पाणी समस्या आहे. त्यामुळेच "पिंपरी-चिंचवडचा पाणीप्रश्न सोडवू" असे आश्वासन देत आम्ही २०१४ मध्ये भोसरी विधानसभा निवडणूक लढवण्याचा निश्चय केला. मतदार संघातील सूज्ञ पिंपरी-चिंचवडकरांनी साथ दिली आणि मला आपला प्रतिनिधी म्हणून विधिमंडळ सभागृहामध्ये काम करण्याची संधी मिळाली. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे आम्ही आंद्रा, भामा-आसखेड पाणी पुरवठा प्रकल्प हाती घेतला. त्याद्वारे २६८ एमएलडी पाणी भोसरी मतदार संघातील तळवडे, चिखली, मोशी, डुडुळगाव, चऱ्होली या भागातील नागरिकांसाठी आरक्षीत करण्यात आले आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

# रेल्वेच्या आसनव्यवस्था बदलामुळे प्रवाशांचा गोंधळ

## मध्य रेल्वेने आपल्या रेल्वेगाड्यांतील डब्यांत नुकतेच काही रचनात्मक बदल केले आहेत, त्यामुळे प्रवासी संभ्रमित झाले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

रेल्वे ही बहुसंख्य प्रवाशांचा पसंतीचे प्रवास साधन आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांची दूर पल्ल्याच्या प्रवासासाठी रेल्वे ही पहिली पसंती असते. वाजवी शुल्क आणि सोयी-सुविधांमध्ये रेल्वेने आपल्या इप्सित स्थळी सुखरूप पोहोचता येते. तथापि, प्रवासाच्या सुरुवातीला उडालेल्या गोंधळामुळे त्यांना मनस्तापाला तोंड द्यावे लागत आहे.

कल्पना करा की तुम्ही तुमच्या वृद्ध पालकांसाठी खालचे आसन-बर्थ राखून ठेवला आहे. पण तुम्ही रेल्वेत येता तेव्हा तुमच्या लक्षात येते, तुम्ही आरक्षित केलेले आसन क्रमांक बदलले आहेत.

तुम्ही आरक्षित केलेले खालचे बर्थ वर गेले आहेत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची किंवा दिव्यांगांची मोठी गैरसोय होत आहे. आपल्या सोयीसाठी नीट शहानिशा करून आसन आरक्षित केल्यानंतर ऐनवेळी असा गैरसोयीचा आसन बदल पाहून बहुसंख्यांना मनस्तापाला तोंड द्यावे लागत आहे. डब्याच्या बाजूच्या अरुंद भागात तीन बर्थ होते. मात्र, ते आता तिसरा बर्थ हटवून दोन बर्थ केले आहेत. परिणामी आसन, बर्थ क्रमांक बदलले आहेत.

अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ उडाला असला तरी, रेल्वे अधिकाऱ्यांनी या निर्णयाचे समर्थन केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार या अरुंद जागेत तिसऱ्या बर्थमुळे प्रवाशांची अडचण होत असल्याच्या तक्रारी होत्या. ऑक्टोबरमध्ये अंतरिम आगाऊ आरक्षण हंगाम संपल्यानंतर ही समस्या जाणवणार नाही, असा रेल्वे अधिकाऱ्यांचा दावा आहे.

ज्या प्रवाशांनी डब्याच्या मोठ्या भागातील तळाच्या, मध्यभागी आणि वरच्या बर्थसाठी ऑनलाइन तिकीट नोंदवले होते, त्यांना पुणे रेल्वे स्थानकावर रेल्वेत आल्यानंतर असे दिसले, की त्यांची आसनव्यवस्थाच बदलली आहे. ऐनवेळी हे समजल्याने त्यांचा मोठा गोंधळ उडाला आणि मोठी निराशा झाली. शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांनी त्यांना वरच्या बर्थवर चढण्यात अडचण असल्याने काळजीपूर्वक तळाचा बर्थ ऑनलाइन नोंदवला होता, त्यांना डब्यात पोहोचल्यानंतर हे पाहून धक्का बसला की त्यांचा आरक्षित खालचा बर्थ आता वरचा बर्थ झाला आहे.

रेल्वेस्थानकावर पोहोचल्यानंतर त्यांनी ज्या डब्यात 'ऑनलाईन तिकीट' आरक्षित केले होते तो डबाच गायब असल्याचे समजल्याने त्यांना धक्का बसला. अनिता म्हणाल्या, "आम्हाला दुसरा बदललेला डबा देण्यात आला होता.



### काही अधिकाऱ्यांच्या आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारी

» पुणे विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू आर. दुबे म्हणाल्या, "१२० दिवसांचा आरक्षण कालावधी १३ ऑक्टोबर रोजी संपला की, आसन क्रमांक आणि बर्थ जुळण्याची समस्या त्यापुढे उद्भवणार नाही. रेल्वे डब्यातील छोट्या भागात अतिरिक्त आसन तयार करण्याचा प्रयोग होता. मात्र तेथे होत असलेली जागेची अडचण आणि प्रवाशांच्या होत असलेल्या गैरसोयीमुळे प्रचंड नाराजी होती. त्यामुळे डब्यांमधून या भागातील मधला बर्थ काढून टाकला. ऑनलाइन आसनस्थिती समजून घेण्याचे पर्याय उपलब्ध आहेत, परंतु प्रतीक्षा यादीतील ज्या प्रवाशांचे आसन निश्चित झाले त्यांना या आसनव्यवस्था क्रमांक न जुळण्याच्या समस्येचा सामना करावा लागतो. १३ ऑक्टोबरपर्यंत या समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत."

### वादाचे प्रसंग वाढले

» तिकीट कलेक्टर धमेंद्र कुमार यांनी सांगितले की, दोन महिन्यांपूर्वी मधल्या बर्थशिवाय नवीन डबे कार्यान्वित केले आहेत, यापूर्वी ज्यांनी आरक्षण केले आहे त्यांच्या आरक्षण आसन क्रमांकाशी नवी आसनव्यवस्था जुळत नसल्यामुळे समस्या निर्माण होत आहेत. खालच्या बर्थचे प्रवासी पाठीच्या समस्यांसारख्या शारीरिक समस्यांचे कारण देऊन ऐनवेळी परस्पर सामंजस्याने आसन बदल करण्यास नाखूष असतात. आमच्यासाठी कोणी जुळवून घेणार नसेल तर आम्ही तरी कशाला जुळवून घ्यायचे? असे त्यांचे म्हणणे आहे. ही समस्या आणखी महिनाभर कायम राहण्याची अपेक्षा आहे. मात्र, त्यामुळे प्रवासी आणि रेल्वे कर्मचारी यांच्यात दररोज वादाचे प्रसंग वाढले आहेत.

> "रेल्वे डब्यांतील छोट्या अरुंद भागातील आसनव्यवस्थेत मधल्या बर्थची रचना अतिरिक्त आसनव्यवस्था तयार करण्याचा एक प्रयोग होता. मात्र, त्यामुळे जागेची अडचण होत असल्याने आणि त्यामुळे प्रवासी अस्वस्थ होत असल्याने या डब्यांतून मधला बर्थ हटवण्यात आला आहे.
>
> - इंदू दुबे, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, पुणे.

# विसर्जन मिरवणूक लवकर संपणार, दगडूशेठ मंडळाचा मोठा निर्णय

## मंडळ मागील वर्षाप्रमाणे यंदाही दुपारी 4 वाजताच विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणार आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्रीमंत दगडूशेठ गणपती मंडळाने विसर्जन मिरवणूक वेळेत होण्यासाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. मंडळ मागील वर्षाप्रमाणे यंदाही दुपारी 4 वाजताच विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणार आहे. दगडूशेठ गणपती ट्रस्टचा हा निर्णय यापुढे कायम रहाणार आहे,

पुणे शहरातील गणेशोत्सव देशभर प्रसिद्ध आहे. पुण्यातील गणपती उत्सव पाहण्यासाठी देशातून अन् विदेशातून भाविक येतात. पुणे शहरातील गणेश विसर्जन मिरवणूक मोठे आकर्षण असते. अनेक वेळा विसर्जन मिरवणूक लांबते. यामुळे श्रीमंत दगडूशेठ गणपती मंडळाने विसर्जन मिरवणूक वेळेत होण्यासाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. मंडळ मागील वर्षाप्रमाणे यंदाही दुपारी 4 वाजताच विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणार आहे. दगडूशेठ गणपती ट्रस्टचा हा निर्णय यापुढे कायम रहाणार आहे, असे मंडळाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.



### हिमालयातील जटोली शिवमंदिरची प्रतिकृती

» दगडूशेठ मंडळाच्या या निर्णयामुळे यंदाही पुण्यातील विसर्जन मिरवणूका लवकर संपणार आहेत. यावर्षी मंडळातर्फे हिमालयातील जटोली शिवमंदिरची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. त्या मंदिरात कर्नाटकातील श्री दत्त संप्रदायाचे ज्ञानराज महाराज माणिक प्रभू यांच्या हस्ते गणेश चतुर्थीला सकाळी 11:11 मिनिटांनी प्राणप्रतिष्ठा होणार आहे.

दगडूशेठ गणपती मंडळाचा देखावा 24 तास सोशल मीडियाच्या माध्यमातून पाहण्यास मिळणार आहे. बाप्पाची मिरवणूक सकाळी साडेआठ वाजता मुख्य मंदिरापासून निघणार आहे. आगमनासाठी सिंह रथ तयार करण्यात येत आहे. पुण्यात १८९४ साली लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरु केली. त्याच्या दोनच वर्षांत १८९६ मध्ये श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची दुसरी मूर्ती तयार करुन उत्सव सुरु केला

# गणेशोत्सव शांततापूर्ण पार पाडण्यासाठी मंडळांचे सहकार्य महत्वाचे : विनयकुमार चौबे

(पान 1 वरून )

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले, यावर्षी शहरातील गणेश मंडळांच्या सोयीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करून परवाना उपलब्ध करून देण्याची सुविधा देण्यात आली आहे, जेणेकरून त्यांना कोणत्याही कार्यालयात उपस्थित राहून अर्ज करण्याची गरज पडणार नाही. सर्व गणेश मंडळांनी या प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करावेत जेणेकरून त्यांना कोणत्याही अडचणीला सामोरे जावे लागणार नाही. याशिवाय सार्वजनिक गणेश मंडळांना महापालिकेच्या जागेवर मंडप किंवा स्टेज व कमानी आदींसाठी परवाना शुल्क माफ करण्यात आले आहे. तसेच शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये शालेय स्तरावर पर्यावरणपूरक गणेश मुर्ती निर्मिती व सजावट स्पर्धा आयोजित करणे, नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी पर्यावरणपूरक घरगुती सजावट स्पर्धेचेआयोजन करणे अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे.

सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर म्हणाले की जे उपक्रम राबवतो ते समाज उपयोगी उपक्रम पाहिजे. तसेच त्यामुळे लोकांचे प्रबोधन झाले पाहिजे. महिला अत्याचाराबाबत जास्त सजग झाले पाहिजे. समाजामध्ये ज्या घटना घडतात त्या उत्सव सणाचे माध्यमातून समाजामध्ये मांडू शकतो. त्यामुळे समाजामध्ये तेढ होणार नाही. तसेच सोशल मीडिया पोस्ट बाबत खात्री केली पाहिजे ती पोस्ट खरी आहे का खोटी आहे तसेच काही वाटले तर संबंधित पोलीस स्टेशनला कळविले पाहिजे. खात्री न झालेल्या पोस्ट इतर लोकांना पोस्ट करू नका तुमची जर खात्री नसेल तर कारण आपल्याला सगळ्या प्रकारची दक्षता गणेशोत्सव दरम्यान घ्यावी.

अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी म्हणाले, गणेशोत्सवाच्या काळात गणेश मंडळांसोबत पोलीसांचीही तयारी सुरू होते. शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते आणि हे कार्यक्रम अडथळे विरहित, शांततेत पार पाडण्याची जबाबदारी पोलीसांच्या खांद्यावर असते. गणेशोत्सव हा सर्व धर्मांना एकत्र आणणारा उत्सव आहे. संपुर्ण महाराष्ट्राच्या उद्दात्त संस्कृतीचे दर्शन घडविणारा हा उत्सव आहे. या उत्सवाच्या माध्यमातून अनेक गणेश मंडळे तयार झाली आणि गणेश मंडळांच्या माध्यमातून तरुणांमध्ये सांघिक वृत्ती तसेच प्रातिनिधीत्व करण्याची आवड निर्माण झाली. याद्वारे मंडळे समाजप्रबोधनात्मक उपक्रम तसेच कार्यक्रम राबवितात. याच मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी पोलीस आयुक्तालयाच्या वतीने मोरया करंडकाची सुरूवात करण्यात आली. शहरातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गणेश मंडळांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी आणि त्यांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. ज्या मंडळांनी या स्पर्धेत सहभागी घेतला नव्हता ज्या मंडळांना पुरस्कार मिळाला नाही त्यांना यावर्षी आणखी प्रयत्न करून सहभागी होण्याची संधी आहे. मागील वर्षी १० दिवस शिस्तबद्ध उत्सव आणि उत्कृष्ट सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या गणेश मंडळांसाठी प्रोत्साहनपर गणेशोत्सव स्पर्धा आयोजित करण्यात आली होती,

# केंद्र व राज्य सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यात भाजप यशस्वी : शहराध्यक्ष शंकर जगताप

## भाजपा चिंचवड विधानसभा अधिवेशन; लाडकी बहिण योजनेला प्रोत्साहित होवून 120 महिलांचा भाजपमध्ये प्रवेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात भारतीय जनता पक्ष यशस्वी ठरला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, युवकांसाठी युवा प्रशिक्षणाच्या माध्यमातून लाभ देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवण्याचे काम महायुतीचे सरकार करीत आहे, जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी भाजपच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी बुथ स्तरावर जाऊन शासनाच्या योजनांची माहिती पोचवण्याचे काम अधिक प्रभावीपणे करावे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. चिंचवड विधानसभा विस्तारित कार्यकारिणी अधिवेशन आज वाकड येथे पार पडले. यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पदाधिकारी, कार्यकर्ते, बूथ प्रमुख यांना मार्गदर्शन करताना शहराध्यक्ष शंकर जगताप बोलत होते. प्रसंगी, महायुती सरकारने महिला भगिनींसाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला प्रोत्साहित होवून 120 महिलांनी भाजपमध्ये प्रवेश केला.




यावेळी, प्रमुख मार्गदर्शक माजी राज्यमंत्री संजय भेगडे, आमदार अश्विनीताई जगताप, माजी महापौर उषा ढोरे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस नामदेव ढाके, महेश कुलकर्णी, चिंचवड विधानसभा प्रमुख काळूराम बारणे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेंद्र राजापुरे, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष मनोज तोरलमल, मंडळ अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, संदीप नखाते, प्रसाद कस्पटे, भाजपा उपाध्यक्ष रविंद्र देशपांडे, बिभीषण चौधरी, भारती विनोदे, अजित कुलथे, मधुकर बच्चे, संदीप गाडे, माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, विनायक गायकवाड, सागर आंघोळकर, नीता पाडाळे, हरीश मोरे, शोभा जांभूळकर, पल्लवी वाल्हेकर, पियुशा पाटील यांच्यासह चिंचवड विधानसभेतील प्रदेश पदाधिकारी, नगरसेवक – नगरसेविका, जिल्हा पदाधिकारी, मोर्चा / आघाडी / प्रकोष्ठ प्रमुख, मंडल अध्यक्ष, मंडल पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बुथ प्रमुख व कार्यकर्ते आदी उपस्थित होते. प्रसंगी, आमदार अश्विनी जगताप यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

माजी राज्यमंत्री संजय भेगडे म्हणाले कि, महाराष्ट्राच्या राजकारणात पिंपरी चिंचवडचा प्रभाव राहिला आहे. राज्यातील पहिले विधानसभा अधिवेशन चिंचवड येथे पार पडत आहे. शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वात दोन महत्वाच्या निवडणुकांमध्ये यश मिळाले आहे, आगामी विधानसभा निवडणुकीतही चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा निवडणुका महायुतीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी सर्वांनी सर्वतोपरी प्रयत्न करावे. विरोधकांकडून फेक नरेटिव्ह पसरविण्यात येत आहेत. त्यांना वेळीच सामोरे जावून उत्तरे द्या. शंभर टक्के मतदार टक्का वाढविण्यासाठी आतापासून बुथ प्रमुखांनी कामाला लागा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चिंचवड विधानसभा संयोजक काळूराम बारणे यांनी केले. शोक प्रस्ताव शशिकांत कदम यांनी मांडला. नवमतदार नोंदणी अभियान व मतदार यादीचा अभ्यास, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्र सरकारचा अभिनंदन, महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीय कल्याणकारी योजना व संविधान जागर, लाडकी बहिण योजना, पिंपरी चिंचवड मनपा मध्ये भाजपने केलेली विकासकामे व शहराच्या हितासाठी घेतलेले निर्णय याबाबत माजी महापौर उषा ढोरे, नामदेव ढाके, राजेंद्र राजापुरे, मनोज तोरडमल, बिभीषण चौधरी यांनी ठराव मांडून त्यांना अनुमोदन देण्यात आले. सुत्रसंचलन मोरेश्वर शेडगे तर आभार संदीप कस्पटे यांनी मानले.

> आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चिंचवड विधानसभा विस्तारित कार्यकारिणीचे अधिवेशन वाकड येथे घेण्यात आले. मावळ लोकसभा निवडणुकीत चिंचवडमधून महायुतीच्या उमेदवाराला ७५ हजाराहून अधिक मताधिक्क्य मिळाले. चिंचवड विधानसभा आमदार महाराष्ट्रातून सर्वाधिक मताधिक्याने निवडून आणण्याचा संकल्प कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी केला आहे. त्यासाठी प्रभावीपणे सदस्य नोंदणी आणि मतदार नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे.
>
> **- शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)**

# 'सिंथेटिक ट्रॅक' च्या निकृष्ट कामाची चौकशी करा : अजित गव्हाणे

(पान 1 वरून)

पिंपरी-चिंचवड शहरातील ॲथलेटिक्स खेळाचा सराव करणाऱ्या खेळाडूंना सरावासाठी शहरातील एकमेव सिंथेटिक मैदान इंद्रायणी नगर येथे आहे. या ठिकाणी ४०० मीटरचा, आठ लेनचा सिंथेटिक ट्रॅक आहे. दहा वर्षांपूर्वी हा ट्रॅक तयार करण्यात आला होता. अनेक वर्षांपासून ट्रॅकवर खेळाडूंचा नियमित सराव आणि विविध स्पर्धांमुळे तसेच बाहेरील वातावरणामुळे जुना ट्रॅक खराब झाला होता. 2023 मध्ये जुना सिंथेटिक ट्रॅक बदलण्याचे काम हाती घेण्यात आले. नव्या ट्रॅकसाठी सुमारे चार कोटींचा खर्च करण्यात आला आहे. नोव्हेंबर मध्ये ट्रॅक खेळाडूंसाठी खुला करण्यात आला. दोन महिन्यातच पुन्हा हा ट्रॅक दुरुस्तीच्या नावाखाली बंद करण्यात आला..15 मार्च 2024 रोजी हा ट्रॅक पुन्हा सरावासाठी खुला करण्यात आला. मात्र त्यानंतर चार ते पाच दिवसातच हा ट्रॅक उखडल्याचे दिसून आले. त्यानंतर पुन्हा पंधरा दिवसांसाठी हा ट्रॅक बंद करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावली. पुन्हा ट्रॅकची दुरुस्ती करण्यात आली. त्याचवेळी येथील प्रशिक्षकांनी दावा केला होता की हा ट्रॅक वर्षभर सुद्धा टिकणार नाही. कारण या ट्रॅकची बांधणी करताना पूर्णतः बेजबाबदारपणा करण्यात आला होता. नुकतीच या ट्रॅकवर पोलीस भरतीच्या उमेदवारांची चाचणी घेण्यात आली.

त्यानंतर आता या ट्रॅकची पूर्णतः दुर्दशा झालेली आहे. अनेक क्रीडाप्रेमी येथे आल्यानंतर त्यांचा हिरमोड होत आहे. कोणत्याही सरावाविना त्यांना घरी परतावे लागत आहे.

या क्रीडा संकुलनातील सिंथेटिक ट्रॅकवर दररोज 300 ते 400 ॲथलेटिक सराव करण्यासाठी येतात. वारंवार या ट्रॅकची दुरुस्ती करावी लागत आहे. आम्ही केलेला सिंथेटिक ट्रॅक तब्बल दहा वर्ष टिकला. बदललेल्या ट्रॅकवर कोट्यावधींचा खर्च करून सहा महिने सुद्धा हा ट्रॅक खेळाडूंना सरावासाठी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे या कामाच्या गुणवत्तेविषयी प्रचंड शंका उपस्थित होत आहे. भाजपच्या सत्ता काळात करण्यात आलेला चार कोटी खर्च क्रीडा संकुलनाची लौकिक कमी करण्यासाठी आणि स्वतःचे खिसे भरण्यासाठी होता का असा संताप अजित गव्हाणे यांनी व्यक्त केला आहे.

पिंपरी चिंचवड पालिकेच्या क्रीडा विभागाचा भोसरी विधानसभेच्या आमदारांच्या दबावाखाली अक्षरशः आंधळा कारभार सुरू आहे. ॲथलेटिकबद्दल कोणतीही माहिती नसलेले निर्णय घेतात. त्यामुळे खेळाडूंचे नुकसान होत आहे. महाराष्ट्र ॲथलेटिक्स टेक्निकल कमिटीकडून चार महिन्यांपूर्वी या ट्रॅकची पाहणी केली गेली. महाराष्ट्रातील सर्वात निकृष्ट दर्जाचा हा ट्रॅक आहे अशी कमिटीची प्रतिक्रिया होती.यामुळे खेळाडूंमध्ये प्रचंड नाराजी आहे. ठराविक लोकांच्या मक्तेदारीसाठी या मैदानाचे स्टॅंडर्ड पालिकेने राखले नसल्याच्या प्रतिक्रिया येथील प्रशिक्षकांनी दिल्या.

# पिंपरी-चिंचवडला जलस्वयंपूर्ण बनवण्याची संकल्पपूर्ती!

(पान 1 वरून)

भविष्यातील २०४१ मधील संभाव्य लोकसंख्या गृहित धरुन शहराला पाणी पुरवठ्याचे स्त्रोत निर्माण करण्याच्या दृष्टीने आम्ही काम करीत आहोत. आंद्रा भामा आसखेड प्रकल्पातील पहिल्या टप्प्यात १०० एमएलडी पाणी शहरात दाखल झाले. आता दुसऱ्या टप्प्याचे काम जून- २०२५ पर्यंत पूर्ण होईल. त्याद्वारे १६८ एमएलडी पाणी मिळणार आहे. पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील 'जैसे थे' आदेश रद्द केला आहे. निगडी जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता वाढवली आहे. समाविष्ट गावांतील विविध ठिकाणी जलकुंभ आणि नवीन जलवाहिनीचे काम सातत्याने सुरू आहे. विशेष म्हणजे, आगामी काळात मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी आरक्षीत करावे. या करिता राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.

भोसरी विधानसभा मतदार संघातील आमदार महेश लांडगे यांनी 'जलस्वयंपूर्ण पिंपरी-चिंचवड' या मुद्दावर पिंपरी-चिंचवडकरांशी 'सोशल मीडिया'द्वारे संवाद साधला.

आमदार लांडगे म्हणाले की, महाराष्ट्राची सांस्कृतिक व शैक्षणिक राजधानी असलेल्या पुण्यासोबत वेगाने विकसित होणारे आपले पिंपरी-चिंचवड शहर. महाराष्ट्रातील सर्वात मोठे ५ व्या क्रमांकाचे आणि देशातील १९ व्या क्रमांकाचे शहर आहे. भारताच्या कानाकोपऱ्यातून वास्तव्य करणाऱ्या नागरिकांचा 'मिनी इंडिया' असलेले आपले शहर 'स्मार्ट सिटी' आणि आता मेट्रो सिटी म्हणून ओळखले जात आहे, ही निश्चितच पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे.

सुरूवातीला पिंपरी-चिंचवड नगरपरिषदेची स्थापना दि. ४ मार्च १९७० रोजी झाली. त्यानंतर दि. ११ ऑक्टोबर १९८२ रोजी महानगरपालिका स्थापन झाली. त्यावेळी शहराची लोकसंख्या अवघी २ लाख ३५ हजारांच्या घरात होती. गेल्या ४२ वर्षांमध्ये शहराची लोकसंख्या ३० लाखांवर पोहोचली आहे. या काळामध्ये शहराची हद्दवाढ १९८२ आणि १९९७ अशी दोनवेळा झाली. पण, त्या तुलनेत जलस्त्रोत निर्माण झाले नाहीत.

### पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत विकासाचे ध्येय...

» आंद्रा-भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेंतर्गत तळवडे येथे १०० एमएलडी जॅकवेल उभा करणे. तसेच, तळवडे ते चिखली जलशुद्धीकरण केंद्र, १०० एमएलडी पाणी पुरवठा वाहिनी, १०० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्र असे प्रकल्प कार्यान्वीत झाले आहेत. १६८ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राची 'वर्क ऑर्डर' देण्यात आली आहे. आता भामा- आसखेड प्रकल्पातील धरणामध्ये बांधण्यात येणाऱ्या जॅकवेलचे काम व थेट पाईपलाईनने पाणी पुरवठा करणे हे काम प्रगतीपथावर असून, जून २०२५ पर्यंत भामा आसखेड प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वयीत होणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराला जलस्त्रोतांमध्ये "आत्मनिर्भर" करण्यासाठी आणि शहराच्या शाश्वत विकासासाठी मी अत्यंत प्रामाणिकपणे काम करीत आलो आहे. विकास ही निरंतर प्रक्रिया आहे, अशी माझी भावना आहे. या पुढील काळात आपल्या साथीने आणि आशिर्वादाने "जल स्वयंपूर्ण पिंपरी-चिंचवड" चे ध्येय निश्चितपणे साध्य करेन, असा विश्वास देतो. "देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि या देशाचे आपण देणे लागतो..." या विचाराने आजवर काम करीत आलो आहे, यापुढेही करीत राहीन, असा 'शब्द'ही आमदार महेश लांडगे यांनी यावेळी पिंपरी-चिंचवडकरांना दिला आहे.

# पुणे शहराचे पूर्वेकडील प्रवेशद्वार खड्ड्यांत

## पुणे -सोलापूर महामार्गाची दुरवस्था : वाहनचालक, नागरिकांतून नाराजीचा सूर

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहराचे पूर्वेकडील प्रवेशद्वार हवेली तालुक्यातून चालू होते. पण या प्रवेशद्वाराचा रस्ताच खड्डेमय झाला असून, हडपसरजवळ अनेक ठिकाणी पुणे – सोलापूर महामार्गावर खड्डे पडले आहेत. हे प्रवेशद्वार खड्ड्यात गेल्याचे नागरिकांनी सांगितले.

हवेलीतील हडपसर, शेवाळेवाडी, मांजरी, कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी, कोरेगाव मुळ, उरुळी कांचन इत्यादी भागातून पुणे शहरात जाणारा पुणे -सोलापूर या महामार्गच्या रस्त्यांची दुरावस्था झाली असुन नवीन तयार करण्यात आलेल्या रस्त्यांचा दर्जा खालावला आहे. त्यामुळे नागरिकांची मात्र गैरसोय होत असल्याने अनेक नागरिकांनी याविषयी नाराजी व्यक्त केली.

शेवाळेवाडी जवळील कुदळे कार ते लक्ष्मी कॉलनीपर्यंत साडेतीन किलोमीटरचा रस्ता दुरुस्ती व डांबरीकरणाच्या नावाखाली कामास सुरुवात केली होती; पण हा रस्ता कुणाला खूश ठेवण्यासाठी केला, हेच नागरिकांना कळले नाही. कारण रस्ता दुरुस्तीस सुरुवात करताच आठवड्यात या रस्त्याला खड्डे पडले. अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की रस्त्यावरून सतत वाहने जात असल्यामुळे डांबराला सेट व्हायला वेळ मिळत नाही. त्यामुळे रस्त्या वर खड्डे पडत आहेत.

कवडीपाट टोल नाका ते कासुर्डी पर्यंत टोल नाका बंद झाल्यापासून रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर चढउतार असल्यामुळे वाहन चालकांना गाडी चालवताना खूपच त्रास होत आहे. तसेच रस्त्यावर अनेक ठिकाणी पाणी साठत असून दुचाकी वाहन चालकांना याचा त्रास जाणवत आहे. लोणी स्टेशन येथे महामार्गावर तात्पुरती डागडुजी करून सुद्धा खड्डे आहे तसेच आहेत. मध्यंतरी शिरूर-हवेलीचे आमदार अशोक पवार यांनी रस्त्याचा दर्जा सुधारण्यासाठी नागरिकांनी लक्ष दिले पाहिजे, असे आवाहन केले होते; परंतु या निगरगट्ट ठेकेदारांमुळे रस्त्याचा दर्जा खूपच खालावला आहे. त्यामुळे आमदारांनी लक्ष देऊन रस्ता चांगला कसा होईल हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सोलापुर हा राष्ट्रीय महामार्ग आहे; पण तरीही त्याची सध्याची परिस्थिती पाहता तो एखादा आडमार्ग आहे की काय, असे वाटू लागलेय.



### तीनही आमदारांनी लक्ष द्यावे

» शिरूर-हवेलीचे आमदार अशोक पवार, हडपसरचे आमदार चेतन तुपे, पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांनी या महामार्गाच्या रस्त्याचा दर्जासंबंधी लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. हा पालखी मार्ग असूनसुद्धा दुर्लक्षित झाला आहे. मध्यंतरी शिरूर-हवेलीचे आमदार अशोक पवार यांनी रस्त्याचा दर्जा सुधारण्यासाठी नागरिकांनी लक्ष दिले पाहिजे, असे आवाहन केले होते; परंतु या निगरगट्ट ठेकेदारांमुळे रस्त्याचा दर्जा खूपच खालावला आहे. त्यामुळे आमदारांनी लक्ष देऊन रस्ता चांगला कसा होईल हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

> पुणे – सोलापुर हा राष्ट्रीय महामार्ग आहे; पण तरीही त्याची सध्याची परिस्थिती पाहता तो एखादा आडमार्ग आहे की काय, असे वाटू लागलेय. सत्तेच्या धुंदीत राज्यकर्त्यांचे त्याकडे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे. महामार्गावर प्रलंबित कामे मार्गी लागली नाही तर मोठे आंदोलन उभारू.
>
> - स्वप्नील कुंजीर, शिवसेना ठाकरे गट संघटक.

> सतत पाऊस पडत असल्यामुळे रस्ता तयार करण्यास अडथळा येत आहे. पाऊस उघडला की रस्ता करण्यात येईल.
>
> - श्रुती नाईक, कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग पुणे.

# परप्रांतीयांचा डाटाच नाही ; शिरूरच्या पूर्व भागातील वास्तवता

## परिसरात अनेक ठिकाणी विटभट्या आणि गुऱ्हाळ असून याठिकाणी काम करणाऱ्या कोणत्याच कामगारांची माहिती निमोणे ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसल्याची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

शिरुर तालुक्याच्या पूर्व भागातील निमोणे गावात (दि २९) सर्पदंशाने एका दोन वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. सर्पदंश झालेल्या मुलीच कुटुंब बिहार राज्यातून निमोणे गावात एका गुऱ्हाळावर मजुरी करण्यासाठी आल होत. निमोणे तसेच परिसरात अनेक ठिकाणी विटभट्या आणि गुऱ्हाळ असून याठिकाणी काम करणाऱ्या कोणत्याच कामगारांची माहिती निमोणे ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे.

शिरुर – तांदळी रस्त्यावर निमोणे हे महत्वाचे गाव असून गावची लोकसंख्या अंदाजे दहा हजाराच्या आसपास आहे. निमोणे गावात जिल्हा बँक, स्टेट बँक, पोस्ट ऑफिस, प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना, महावितरणचे सबस्टेशन आहे. दर बुधवारी गावात आठवडे बाजार भरतो. त्यामुळे या गावात कायम वर्दळ असते. गावाच्या पूर्व भागात पिंपळाची वाडी येथे अंदाजे १५ ते २० विटभट्या असून काही गुऱ्हाळ आहेत. या विटभट्या तसेच गुऱ्हाळावर काम करणारे मजुर हे परप्रांतीय किंवा राज्याच्या विविध भागातून आलेले आहेत. परंतु गावातील विटभट्या व गुऱ्हाळावरील मजुरांची ग्रामपंचायतकडे कोणतीही नोंद उपलब्ध नाही.



### गावात चारही बाजुने अतिक्रमण

» गायरान जमिनीत अवैधरीत्या पत्र्याचे शेड तसेच पक्की घरे बांधून त्या ठिकाणी मोठया प्रमाणात गावठी दारु विक्री करण्यात येत असुनही ग्रामपंचायत त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचीही दबक्या आवाजात चर्चा आहे.

### निमोणे येथे गंभीर गुन्ह्यांची नोंद

» निमोणे येथे साधारण दोन वर्षांपूर्वी बाहेरुन गावात पाहुणा म्हणून आलेल्या एका वृद्ध व्यक्तीचा खून करण्यात आला होता. आजपर्यंत पोलिसांना या घटनेतील आरोपीचा तपास लागलेला नाही. त्यामुळे बाहेरुन गावात उदरनिर्वाहासाठी येणाऱ्या मजुरांचे पोलीस व्हेरीफिकेशन करण गरजेचे असताना ग्रामपंचायत त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

### मजुरांना ना सुविधा ना विमा

» विटभट्टी तसेच गुऱ्हाळावर काम करणाऱ्या मजुरांना काही मालकांकडुन कोणत्याही सुविधा पुरविल्या जात नसल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. काही मजुरांना शौचालय उपलब्ध नसल्याचे तर काहींना मोबाइलही नसल्याची माहिती मिळत आहे. सर्पदंशाने मृत्यू झालेल्या चिमुकलीच्या कुटुंबातील व्यक्तींना गुऱ्हाळ मालकाने जबरदस्तीने त्यांच्या मूळ गावी पाठवून दिले असल्याचीही निमोणे परिसरात दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे. याबाबत गुऱ्हाळ मालकाला संपर्क साधला असता. त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.